# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक ३०८ शनिवार दि.०७ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# एका क्लिकवर मिळणार जात प्रमाणपत्र; फडणवीस सरकारचा निर्णय लाखो नागरिकांसाठी ठरणार क्रांतिकारी

मुंबई : जात प्रमाणपत्र किंवा जातवैधता प्रमाणपत्रासाठी शासकीय कार्यालयांचे चकरा, वेळखाऊ प्रक्रिया, आणि कागदपत्रांची डोंगराएवढी झळती यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे अक्षरशः नाकीनऊ होते. मात्र, हे चित्र लवकरच बदलणार आहे. कारण, महाराष्ट्र सरकारने जात प्रमाणपत्र ऑनलाइन प्रणालीसाठी हिरवा कंदील दिला असून, लवकरच ही सुविधा प्रत्यक्षात येणार आहे.

काय आहे या नव्या ऑनलाइन प्रणालीचं स्वरूप?

राज्य सरकारने मान्यता दिलेल्या या नव्या संगणकीकृत प्रणालीतून अर्जदार एका क्लिकवर जात प्रमाणपत्र मिळवू शकणार आहे. ही प्रणाली पारदर्शक, जलद आणि अत्याधुनिक असेल.

यासाठी बार्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था) आणि ढउड (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस) यांनी संयुक्तपणे प्रस्तावित प्रणाली विकसित केली आहे. यानुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व संबंधित विभागांना पुढील १०० दिवसांत कृती आराखडा सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

नव्या प्रणालीमधील ठळक वैशिष्ट्ये:

–ख आधारित इंटरफेस – अर्जदाराला प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन करणारे स्मार्ट यूजर इंटरफेस.

ऑटो पडताळणी – अर्जदाराचे नाव, नातेवाइकांची माहिती आणि आधारवरील पत्ता प्रणालीद्वारे थेट पडताळला जाणार.

डीजी लॉकर एकत्रिकरण – कागदपत्रे थेट उ्ळसळडेलज्ञशी वरून घेतली जाणार, त्यामुळे वेग आणि विश्वासार्हता वाढणार.

विलंबाला चाप – सद्य:स्थितीत महिन्यांपर्यंत चालणारी प्रक्रिया, काही तासांत पूर्ण होण्याची शक्यता.

कोणता वर्ग होणार लाभार्थी?

अनुसूचित जाती (डउ)
अनुसूचित जमाती (ड्ढ)
भटक्या आणि विमुक्त जमाती
इतर मागासवर्गीय (जइउ)
विशेष मागास प्रवर्ग

या सर्व घटकांतील नागरिकांना शासकीय नोकऱ्या, शिक्षणातील आरक्षण, निवडणुकीतील राखीव जागा आणि विविध सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी जात प्रमाणपत्र आवश्यक असते. मात्र, यासाठीची प्रक्रिया आतापर्यंत अत्यंत गुंतागुंतीची आणि वेळखाऊ होती.

सरकारच्या या निर्णयाचा प्रत्यक्ष फायदा काय?

हजारो अर्जदारांचा वेळ, पैसे आणि श्रम वाचणार
भ्रष्टाचाराला आळा
बनावट कागदपत्रांवर नियंत्रण
शैक्षणिक व शासकीय संधी मिळवण्यात मदत

## पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा आदर्श आजच्या राज्यकर्त्यांनी घ्यावा-- डॉ हनुमंत सौदागर बोरगाव येथे अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी



केज /प्रतिनिधी :- ऊत्तम प्रशासक आदर्श राज्यकारभार न्याय ,पर्यावरण संर्वधन महिला सबलीकरण सतीप्रथा झुगारून देऊन उत्तम राज्यकारभार केला. त्यावेळी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत नव्हत्या. आजच्या राज्यकर्त्यांनी त्यांचा आदर्श घेऊन राज्यकारभार करावा असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते बोरगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबासाहेब निंगुळे,प्रमुख उपस्थिती पंचायत समितीचे माजी सभापती विष्णू घुले,सरपंच बाळासाहेब गव्हाणे,दिगंबर गव्हाणे,शशिकांत गव्हाणे ,भगवान गाते,आदींची उपस्थिती होती. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा, पहिली ते बारावी वर्गात प्रथम द्वितीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरानी आपले विचार मांडुन जयंती साजरी केली हाच अहिल्यादेवींचा खरा विचार आहे असे मत व्यक्त केले. अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्रावर विचार मांडले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आरंभ फाउंडेशन अशोक निंगुळे,जगन्नाथ होळकर,अश्रूबा भूतकर,निलेश निंगुळे,विजय निंगुळे, हनुमंत होळकर,दीपक होळकर, परसराम चौरे,गोपाळ निंगुळे, दत्तात्रय होळकर,संतोष होळकर, निंगुळे,सुंदर होळकर,निखिल मुसळे,रामभाऊ भूतकर,ॲड उत्तरेश्वर निंगुळे,शिवाजी निंगुळे,आदींनी परिश्रम घेतले.

## पर्यावरण दिनानिमित्त माफ़सूच्या संचालनालय विस्तार शिक्षण येथे वृक्षारोपण



नागपूर /प्रतिनिधी :- जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विश्वविद्यालय (माफसू), नागपुर अंतर्गत संचालनालय, विस्तार शिक्षण आणि शेतकरी भवन परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सध्याच्या काळात मोठया प्रमाणात होणार वृक्षतोड आणि त्यामुळे वाढणारे तापमान ही गंभीर समस्या बनली आहे. या वर्षी तापमान हे ४५ ते ४७ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले असुन यापुढेही तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे. यामुळे 'झाडे लावा, झाडे वाचवा' ही काळाची गरज बनली आहे. वृक्ष लागवड आणि त्याचे संवर्धन यावर भर देण्याचे आवाहन या कार्यक्रमात करण्यात आले.

या प्रसंगी संचालक, विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने, तांत्रीक अधिकारी डॉ. सारीपुत लांडगे, कास्ट्राईब महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे (नागपूर शाखा) उपाध्यक्ष प्रवीण बागडे, सचिव जितेंद्र हातमोडे, मोहन कापसे, अतुल जाधव, राजेश गहलोद आणि स्वप्नील दाते ई. प्रामुख्याने उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

## व्ही एस पँथर्स च्या वतीने शिवराज्याभिषेक दिन साजरा




लातूर: व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोद खटके यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी सातारा नगरपालिकेचे नगरसेवक बाळासाहेब खंदारे संघटनेचे मार्गदर्शक रवी कुरील पंकज शिंदे सह आदी जण उपस्थित होते.

## भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून खरोळा येथील पिंपळे परिवाराचे सांत्वन

लातूर :- अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊसात विजेचा शॉक लागून झालेल्या दुर्दे वी घटनेत भाजपाचे कार्यकर्ते खरोळा येथील शेतकरी महारूद्र (राजाभाऊ) बसवंतआप्पा पिंपळे यांचे दुःखद निधन झाल्याचे समजल्याने भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी खरोळा येथे जाऊन पिंपळे परिवाराचे सांत्वन केले व धीर दिला.

अत्यंत सामान्य कुटुंबातील राजाभाऊ पिंपळे यांच्या अकाली निधनाने कुंटूबावर मोठे दुःख कोसळले आहे. भाजपाचे नेते आ. श्री रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी दुपारी खरोळा येथे जाऊन पिंपळे परिवाराची भेट घेतली. यावेळी मयत महारुद्र यांचे वडील बसवंतआप्पा पिंपळे, आई मन्याबाई, पत्नी मिनाबाई, मुलगा अवधूत, मुलगी मेघा आणि अमृता यांच्याकडून घडलेल्या घटनेची माहिती घेऊन सांत्वन केले व वैयक्तिक मदत केली. गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेतून पिंपळे कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत सबंधितांना सूचना दिल्या. याप्रसंगी आ. कराड यांच्यासमवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे





भागवत सोट, पंचायत राज सेलचे नवनाथ भोसले, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

यावेळी बाळूअप्पा हेने, हनुमंतकाका राऊतराव, प्रताप राऊतराव, राजकुमार मानमोडे, मोहन सुभान राऊतराव, विजयकुमार शिंदे, केदारनाथआप्पा पिंपळे, केदारनाथ सपकाळ, गोविंद आडतराव, रमाकांत फुलारी, सत्यवान राऊतराव, संगमेश्वर ततापुरे, सोमनाथ चापोले, डॉ. महेंद्र पिंपळे, राजेश्वर उकर्डे, पुंडलिक आदुडे, वैजनाथ भालेकर, बालासाहेब आडतराव, संजय पिंपळे, राहुल कपाळे, ईबा पिंपळे, भागवत अडतराव, सिद्धू मदने, मच्छिंद्र कपाळे, बाळू पाटील, विश्वंभर रवळे, जगन्नाथ रवळे, संदीप पिंपळे, मंगेश पिंपळे, वैजनाथ घोडके, पद्माकर मोतमफळे, अंकुश डोके, बालाजी बावचकर, ज्ञानोबा भोपी, भैय्या दीक्षित यांच्यासह इतर अनेक जण होते.

# कंत्राटी सफाई कामगारांचे मंगळवारपासून लातुरात काम बंद आंदोलन किमान वेतन, पी. एफ. व सुरक्षा साधने, सुट्टया, रजा, बोनस देण्याची मनपाकडे मागणी





लातूर : महानगरपालिका अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी सफाई कामगारांना कायद्यानुसार किमान वेतन, पी. एफ., सुरक्षेची साधने, सुट्टया व रजा मिळाव्यात यासाठी आठ महिन्यापासून अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेने या मागण्या लावून धरलेल्या आहेत. तरीही कोणतीच कार्यवाही होत नाही. साधी निवेदनाची दखल देखील घेतली नाही. त्यामुळे १० जून मंगळवारपासून लातूर शहरात कचरा उचलण्याचे काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. तसे निवेदन मनपा प्रशासक यांना अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मनपा आयुक्तांना दिले आहे.

किमान वेतन अधिनियम १९४८ कायदा कामगारांना लागू आहे. तसेच कंत्राटी कामगार अधिनियम १९७० या दोन कायद्यानुसार कामगारांना किमान वेतन मिळायला पाहिजे. तसेच रजा, सुट्टया, कामाचा जादा मोबदला, बोनस, पी. एफ. ग्रॅच्युटी, घरभाडे भत्ता, धुलाई भत्ता, सुरक्षेची साधने, मास्क, गमबूट, हातामौजे, छत्री, रेनकोट, गणवेश, आरोग्य तपासणीया सुविधा देणे दोन्ही कायद्यानुसार कामगारांना देणे बंधनकारक आहे. अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटना गेल्या आठ महिन्यापासून या कायद्याची अंमलबजावणी व्हावी यासाठी अर्ज, विनंत्या, निवेदनद्वारे लातूर मनपाकडे पाठपुरावा केलेला आहे. ७ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय सफाई कामगार कर्मचारी आयोगाचे सदस्य डॉ. पी पी. वावा हे लातूर जिल्हा दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यात त्यांनी लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यासोबत एक आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सफाई कामगारांच्या वरील सर्व मागण्याबाबत अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांना दिले. सदर निर्देश देऊनही आठ महिने झाले तरी कंत्राटी सफाई कामगारांच्या हिताचे, हक्काचे निर्देश डावळण्यात येत आहेत. त्यामुळे १० जून मंगळवार पासून लातूर शहरातील कचरा उचलण्याचे, स्वछतेचे काम बंद आंदोलन करण्यात येणार आहे. असा इशारा मनपा आयुक्तांना संघटनेच्या वतीने एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

सदर निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर, शहराध्यक्ष विशाल काळे, ज्योती उपाडे, लहू जगताप, परमेश्वर कांबळे, महेंद्र कांबळे, सुधीर कांबळे, अय्युब शेख, ईश्वर काळे, सुनील सगट, सचिन काळे, अंजनाताई सगट, अभिजित बनसोडे, कुमार कांबळे, अमोल शिंदे, रोहित कांबळे, अन्तेश्वर सगट, अंगद बनसोडे, सूर्यकुमार गायकवाड, ईश्वर कासारे, विनोद मोरे, पवन लांडगे, सचिन देसाई, रमाकांत शिंदे, अमोल अडसूळ आदिसह अनेक कामगाराचा समावेश होता.

# संपादकीय

## पर्यायही नाही!

उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंची मनसेना यांच्या एकत्र येण्याच्या चर्चा सुरू आहेत. या विषयावर देश थांबला आहे किंवा गेला किंवा महाराष्ट्र थांबला आहे असे अजिबात नाही. या दोघांनी एकत्र यावे अशी इच्छा मात्र असंख्य जणांची आहे. तथापि, राजकारणात एकत्र येणे किंवा विभक्त होणे हे भावनेच्या आधारावर घेतले जाणारे निर्णय नसतात. तेथे सरळसरळ नफा-नुकसानीचा हिशेब असतो. तसे जर नसते तर विचारधारेत काडीचेही साम्य नसलेले पक्ष गेल्या पाच वर्षांत एकत्र आले नसते. त्याहीपुढे म्हणजे आपल्या पितृपक्षाशी फारकत घेऊन नवीन चूल मांडण्याची घाई काही नेत्यांनी केली नसती. त्यांना त्यांच्या लाभाचे गणित खुणावत होते व त्यानुसार नेत्यांनी निर्णय घेतले. राज्याच्या राजकारणात झालेल्या उलथापालथीचा सगळ्यांत लाभार्थी जर कोणी ठरला असेल तर तो भारतीय जनता पक्ष अन् सगळ्यांत जास्त तोटा जर कोणाचा झाला असेल तर ठाकरे या ब्रँडचा. या भूमिकेतून विचार करायचा झाल्यास ठाकरे बंधूंकडे एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही. फक्त पहिला फोन कोणी करायचा यातच त्यांनी वेळ घालवला तर महाराष्ट्राचे नंतर बघता येईल, त्यांचे नुकसान आणखीनच वाढत जाईल व कदाचित आता डागडुजीची मुळीच शक्यता नाही येथपर्यंत ते जाऊन पोहोचतील. राज्यातील फोडाफोडीत दोन्ही ठाकरेंच्या पक्षांना जवळपास शून्यावर यावे लागले आहे.

राज ठाकरे यांनी बाळासाहेबांच्या पक्षातील नेते न फोडता वेगळा पक्ष स्थापन केला आणि आपल्या प्रभावी वक्तृत्व शैलीद्वारे त्यांचे शिलेदार जमवले. पहिल्या सर्वच मग त्या स्थानिक स्वराज्य संस्था असोत वा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये त्यांना भरभरून मते मिळाली. दिल्लीच्या केजरीवालांनी पहिल्याच प्रयत्नात सरकार स्थापन केले तसे राज करू शकले नाहीत. त्याचे कारण दिल्ली वेगळी आणि महाराष्ट्र वेगळा. शिवाय केजरीवालांचे राजकारण वेगळे आणि राज यांची शैली वेगळी. ते मराठी आणि हिंदुत्वाच्या मुद्द्यांवर हेलकावे घेत राहिले. उद्धव ठाकरे यांच्याकडे पित्याने उभी केलेली एक जवळपास अर्धा शतकाचा इतिहास असलेली भरभक्कम संघटना होती. या संघटनेत कट्टर आणि निष्ठेची चाड असलेले नेते होते. बाळासाहेबांच्या हयातीत त्यांच्या शिवसेनेला हादरे बसले तथापि, रस्त्यात एखादा खड्डा आल्यावर थोडा धक्का बसावा एवढीच त्याची व्याप्ती होती. खरा हादरा बसला तो एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर. त्यांनी जवळपास ९० टक्के लोकप्रतिनिधी आपल्यासोबत नेले आणि उद्धव यांना मुख्यमंत्रिपद सोडावे लागले. तरीही पक्षसंघटना व विशेषत: शिवसैनिक त्यांच्यासोबत असल्यामुळे त्यांना फिकीर नव्हती व सरकार गमावल्याचा धक्का ते सहन करू शकले. आता ती स्थिती नाही. पक्षसंघटनेलाच गळती लागली आहे. मुंबईपासून नाशिक आणि विदर्भ आणि मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातूनही उद्धव सेनेतून आउटगोईंग सुरू आहे. हे सगळे थोपवण्यात बाळासाहेबांकडे ज्या धडाडीचे नेते होते व त्यांचा जो वचक होता तो उद्धवसेनेकडे सध्या नाही हे वास्तव आहे. हीच अवस्था राज यांच्या मनसेचीही आहे. स्थापनेपासून नाशिक महापालिकेचा अपवाद वगळला तर कुठलीही सत्ता नाही व ती येण्याची शक्यताही दिसत नसल्यामुळे नियमितपणे राज यांच्या सेनेतून आउटगोईंग सुरूच आहे. पदाधिकार्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या उड्या मारण्याला दोन्ही ठाकरेंनी आतापर्यंत फारशी धूप घातली नसली, तरी आता महाराष्ट्रातील स्थिती ती नाही जी दहा वर्षांपूर्वीपर्यंत होती.

भारतीय जनता पार्टीने महाराष्ट्र बर्यापैकी काबीज केला आहे. केंद्रात आणि राज्यातील सत्ता त्यांच्याकडे आहेच, मात्र, अनेक महापालिका आणि अन्य संस्थांवर त्यांनी पद्धतशीर जम बसवला आहे. शरद पवारांच्या आव्हानाचा सामना करत सहकार क्षेत्रातही शिरकाव केला आहे. राज्यातील विविध समाजांचा विचार करता प्रत्येक समाजात आपला एक चेहरा उभा करून त्यांना भक्कम पाठबळ देत नेता म्हणून प्रस्थापित करण्यातही भाजपच्या देवेंद्र फडणवीस यांना यश मिळाले आहे. शिवसेना संपवू शकणार नाही याची कल्पना भाजपला होती आणि आहे. पण ती खिळखिळी केली जाऊ शकते याची त्यांना खात्री होती आणि त्यांनी उपलब्ध सर्व पर्यायांचा वापर करून आपले ध्येय साध्य केले. बाळासाहेबांच्या हयातीत जी मंडळी तिसर्या किंवा चौथ्या रांगेत होती किंवा जे रांगेपर्यंतही पोहोचले नव्हते ते आज सत्तेत आहेत व आपल्या राजकीय जीवनाची ज्या पक्षातून सुरुवात केली त्या पक्षाच्या नेतृत्वाला आव्हान देत आहेत. अर्थात, राजकारणात उदय आणि अस्त असतो; पण भरारी घेण्याची व त्याकरता योग्य वेळी योग्य निर्णय घेण्याचीही संधी मिळत असते. एका मुलाखतीत राज यांनी महाराष्ट्राकरता एकत्र येण्याचे सूतोवाच केले व त्याला बहुदा पहिल्यांदाच उद्धव यांनी जाहीरपणे सकारात्मक प्रतिसाद दिला. आतापर्यंत घडलेली ही एकमेव सकारात्मक बाब. पूर्वी उद्धव यांनी काही बोलायच्या आत त्यांचे सरदारच मनसेनेला मोडीत काढून मोकळे व्हायचे.

आता आदित्य ठाकरे, संजय राऊत आणि अन्य मंडळीही सकारात्मक बोलत आहेत. एका ठिकाणी दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी एकत्र आंदोलनही केले. महाराष्ट्राचा एक स्वभाव आहे. कुटुंबात निर्माण झालेली कटुता फार काळ टिकत नाही व लोकांनाही ती आवडत नाही. दोन्ही भावांनी एकत्र येणे त्यांच्या स्वत:साठी आणि मराठी माणसासाठी आवश्यक आहेच, पण त्याहीपेक्षा अधिक राज्यात एक समर्थ आणि सक्षम पर्याय असावा, किमान सरकारवर अंकुश ठेवू शकेल अशी शक्ती असावी म्हणूनही ते आवश्यक आहे.

# त्याग आणि बलीदानाचा सण : ईद अल-अजहा

ईद-उल-अजहा किंवा बलिदानाची ईद हा एक मुस्लिम सण आहे. हा सण जगभर साजरा केला जातो. या दिवशी कुराणमधील बळीची घटना साजरी केली जाते. याच दिवशी अल्लाच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी पैगंबर इब्राहिमांनी आपला मुलगा इस्माईलचा बळी देण्याच्या इच्छेचा सन्मान केला. इब्राहिम आपल्या मुलाचे बलिदान देत होते, तथापि, अल्लाहने त्यांना एक कोकरू प्रदान केले जो त्यांनी त्यांच्या मुलाच्या जागी बळी द्यायचे होता कारण त्यांनी अल्लाहच्या नावाने स्वतःच्या मुलाचे बलिदान देण्याची इच्छा दर्शविली होती. या हस्तक्षेपाच्या स्मरणार्थ प्राण्यांचा विधीपूर्वक बळी दिला जातो. त्यांच्या मांसाचा काही भाग प्राणी अर्पण करणारे कुटुंब वापरतात, तर उर्वरित मांस गरीब आणि गरजूंना वाटले जाते. मिठाई आणि भेटवस्तू दिल्या जातात, लहान मुलांना भेटवस्तू किवा पैसे दिले जातात आणि विस्तारित कुटुंबातील सदस्यांना भेट दिली जाते आणि त्यांचे स्वागत केले जाते. या दिवसाला कधीकधी महान ईद देखील म्हटले जाते. हा सण कुर्बानीचा सण किंवा पवित्र हज यात्रेचा सण म्हणूनही ओळखला जातो.

बलिदानाचा सण हिजरीच्या शेवटच्या महिन्यात, झु-अल-हज मध्ये साजरा केला जातो. जगभरातील मुस्लिम या महिन्यात सौदी अरेबियातील मक्का येथे एकत्र येऊन हज साजरा करतात. या दिवशी ईद-उल-अजहाही साजरी केली जाते. खरे तर हा हजचा एक भाग आणि मुस्लिमांच्या भावनांचा दिवस आहे. जगभरातील मुस्लिमांचा एक गट मक्का येथे हज करतो, जो उर्वरित मुस्लिमांसाठी आंतरराष्ट्रीय भावनांचा दिवस बनतो. ईद-उल-अजहा चा शाब्दिक अर्थ त्यागाची ईद आहे, या दिवशी एखाद्या प्राण्याचा बळी देणे हा एक प्रकारचा प्रतीकात्मक बलिदान आहे.

हज आणि त्याच्याशी संबंधित विधी हजरत इब्राहिम आणि त्यांच्या कुटुंबाने केलेल्या कार्याची प्रतिकात्मक पुनरावृत्ती आहे. हजरत इब्राहिम यांच्या कुटुंबात त्यांची पत्नी हाजरा आणि मुलगा इस्माईल यांचा समावेश होता. असे मानले जाते की हजरत इब्राहिमला एक स्वप्न पडले होते ज्यात ते आपला मुलगा इस्माईलचा बळी देत होते, हजरत इब्राहिम आपल्या दहा वर्षाच्या मुलगा इस्माईलला देवाच्या मार्गावर बलिदान देण्यासाठी निघाले. देवाने त्याच्या देवदूतांना पाठवून इस्माईल ऐवजी एका प्राण्याचा बळी देण्यास सांगितले, असा उल्लेख पुस्तकांमध्ये आहे. वास्तविक इब्राहिमकडून मागितलेला खरा त्याग हा त्याचाच होता, तो म्हणजे स्वतःला विसरून जा, म्हणजे आपले सुख-सुविधा विसरून स्वतःला मानवतेच्या सेवेत पूर्णपणे झोकून द्या. मग त्यांनी आपला मुलगा इस्माईल आणि आई हाजरा यांना मक्केत स्थायिक करण्याचा निर्णय घेतला. पण मक्का त्याकाळी वाळवंट होता,त्यांना मक्केत स्थायिक केल्यानंतर ते स्वतः मानवसेवेसाठी बाहेर पडले. अशाप्रकारे वाळवंटात स्थायिक होणे हा त्याचा आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाचा त्याग होता.

इस्माईल मोठा झाल्यावर एक काफिला तिथून निघून गेला आणि इस्माईलचा त्या काफिल्यातील एका तरुणीशी विवाह झाला, त्यानंतर वंश सुरू झाला. ज्यांना इतिहासात इस्माईल किंवा वानू इस्माईल म्हणून ओळखले जाते. हजरत मुहम्मद साहेब यांचा जन्म याच घराण्यात झाला. ईद-उल-अजहाचे दोन संदेश आहेत: पहिला, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याने स्वार्थाच्या पलीकडे जाऊन मानवी उन्नतीसाठी स्वतःला गुंतवून घेतले पाहिजे. ईद-उल-अधा एका लहान कुटुंबात कसा नवीन अध्याय लिहिला गेला याची आठवण करून देतो. या दिवशी मशिदींमध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम एकत्र येतात. लाखो मुस्लिम पांढरे कुर्ता घालून ईदगाह किंवा मोठ्या मशिदीत ईदची नमाज अदा करतानाचे दृश्य खूप आनंददायी असते. नमाज अदा केल्यानंतर उंट, बकरी, खेचर, मेंढ्या इत्यादी चार पायांच्या प्राण्यांची कुर्बानी दिली जाते.

या दिवशी मुस्लिम त्यांचे नवीन किंवा आवडते कपडे घालतात. महिला शॉर्टब्रेड कुकीजसह विशेष पदार्थ बनवतात. त्या कुटुंब आणि मित्रांसोबत एकत्र येतात. या दिवशी ईदची नमाज एकत्रितपणे अदा केली जाते. नमाज जमवण्यात महिलांचा सहभाग समुदायानुसार वेगवेगळा असतो. यात दोन भाग असतात, पहिल्या भागामध्ये सात तकबीर तर दुसऱ्या भागामध्ये पाच तकबीर असतात. शिया मुस्लिमांसाठी, सलात अल-ईद पाच दैनंदिन प्रार्थनेपेक्षा वेगळी असते कारण दोन्ही ईदच्या नमाजांसाठी इश्वा किंवा इकामा स्पष्टपणे केला जात नाही. नमाजानंतर इमाम उपदेश देतात. नमाज आणि उपदेशांच्या शेवटी, मुस्लिम एकमेकांना मिठी मारुन 'ईद मुबारक' म्हणत शुभेच्छा देत भेटवस्तूंची देवाणघेवाण करतात. अनेक मुस्लिम याप्रसंगी त्यांच्या गैरमुस्लिम मित्रांना, शेजारी, सहकारी आणि वर्गमित्रांना त्यांच्या ईद उत्सवात आमंत्रित करतात जेणेकरून त्यांना इस्लाम आणि मुस्लिम संस्कृतीची चांगली ओळख करून दिली जाते.

इस्लामिक मान्यतेनुसार, बकरी ईदची नमाज ही दोन रकातची नमाज आहे, जी अजान आणि इकमतशिवाय जमावाने अदा केली जाते. या नमाजात अधिक तकबीर आहेत, सहसा पहिल्या रकातमध्ये ६ आणि दुसऱ्या रकातमध्ये ५, जरी वेगवेगळ्या इस्लामिक पंथांमध्ये ही संख्या थोडी वेगळी असू शकते. नमाजानंतर इमाम प्रवचन देतो, जे ऐकणे सुन्नत मानले जाते. मुस्लिमांना या दिवशी चांगले कपडे घालण्याचा, सुगंधी अत्तर लावण्याचा आणि मोकळ्या मैदानात किंवा मोठ्या मेळाव्यात नमाज अदा करण्याचा सल्ला दिला जातो. ईद-उल-अजहा दरम्यान लोकांना मांस वाटणे, ईदच्या पहिल्या दिवशी ईदच्या नमाजपूर्वी आणि ईदच्या तीन दिवसांत नमाजानंतर तकबीर म्हणणे हे या महत्त्वाच्या इस्लामिक सणाचे आवश्यक भाग मानले जातात.

ईदगाह किंवा मशीद नावाच्या खुल्या वक्फ मैदानावर मोठ्या मेळाव्यात ईदची नमाज अदा करण्यासाठी पुरुष, महिला आणि मुले यांनी त्यांचे उत्तम कपडे परिधान करावेत अशी अपेक्षा असते. ज्यांना परवडणारे श्रीमंत मुस्लिम त्यांचे सर्वोत्तम हलाल पाळीव प्राणी, सहसा गाय, कुर्बानी देऊ शकतात, परंतु प्रदेशानुसार उंट, बकरी किंवा मेंढी, इब्राहीमच्या एकुलत्या एका मुलाची बलिदान देण्याच्या इच्छेचे प्रतीक म्हणून. बलिदान दिले जाणारे प्राणी ज्याला अधिया म्हणतात, ज्याला पर्शियन-अरबी शब्द कुर्बानी देखील म्हणतात, विशिष्ट वय आणि गुणवत्तेचे मानक पूर्ण करावे लागतात अन्यथा तो प्राणी अस्वीकार्य बलिदान मानला जातो. एकट्या पाकिस्तानमध्ये २.० अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे अंदाजे दहा दशलक्ष प्राणी ईदच्या दिवशी बलिदान दिले जातात. बलिदान दिलेल्या प्राण्याचे मांस तीन भागांमध्ये विभागणे पसंत केले जाते. एक तृतीयांश कुटुंबात अबाधित राहते आणि एक तृतीयांश नातेवाईक, मित्र आणि शेजाऱ्यांना दिले जाते आणि उर्वरित एक तृतीयांश गरीब आणि गरजूंना दिले जाते. आज या प्रसंगी सर्व मुस्लिम बंधू आणि भगिनींना ईद-उल-अजहाच्या हार्दिक शुभेच्छा!

**********

प्रविण बागडे
नागपूर

# चिन्नास्वामी स्टेडियमवर एकीकडे मृत्यूचे तांडव तर दुसरीकडे उत्सवाचा आनंद ही कसली खुशी?

दिनांक ३ जूनला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू टिमने आयपीएलची मॅच १८ वर्षांनंतर जिंकून इतिहास घडविला हि बाब ठीक आहे याचे मनापासून स्वागत.परंतु दिनांक ४ जूनला बंगळुरू टिमने मॅच जिंकण्याची खुशी साजरी करण्यासाठी चिन्नास्वामी स्टेडियमवर भव्य आयोजन करण्यात आले होते.परंतु या स्टेडियमच्या मैदानाची क्षमता फक्त ३५ हजार असतांना मर्यादेपेक्षा जास्त म्हणजे ३ लाखांपेक्षा जास्त लोक जमले यामुळे मैदानाबाहेर मोठ्या प्रमाणात चेंगराचेंगरी होऊन ११ लोकांचा मृत्यू झाला व ३० पेक्षा अधिक लोक गंभीररीत्या जखमी झाले.ही अत्यंत दुर्दैवी आणि अंगावर शहारे येणारी घटना चिन्नास्वामी स्टेडियमच्या परिसरात पहायला मिळाली व मोठ्या जल्लोषाला चेंगराचेंगरीचे गालबोट लागले.ही घटना कर्नाटक प्रशासन व कर्नाटक क्रिकेट असोसिएशन यांच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे स्पष्ट दिसून येते.आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकीकडे लोक चेंगराचेंगरीत मृत्यूमुखी पडत आहे तर दुसरीकडे अनेक जण गंभीर जखमी स्थितीत आहे.तरीही कर्नाटक क्रिकेट असोसिएशन, कर्नाटक सरकार व आयपीएल जिंकलेली बैंगलूर टिम यांच्या डोळ्यासमोर स्टेडियमच्या बाहेर चेंगराचेंगरीमुळे झालेले मृत्यूचे तांडव व जखमींची भयावह स्थिती समोर असुन सुद्धा आनंद उत्सव साजरा केला ही अत्यंत घृणास्पद व मानवजातीला काळीमा फासणारी घटना आहे. एकीकडे लोक मरत आहेत आणि तुम्ही दुसरीकडे आनंद साजरा करता हा कसला जल्लोष! अशा आनंदाचा धिक्कार आहे.बंगळुरू क्रिकेट असोसिएशन व कर्नाटक सरकारने स्टेडियमच्या बाहेरील चेंगराचेंगरी यात मृत्यूमुखी पडलेले व जखमी झालेले संपूर्ण बंगळुरू टिमचे चहाते होते.अशा परिस्थितीत या कार्यक्रमाला ताबडतोब स्थगिती देवुन शोक प्रगट करने गरजेचे होते.परंतु दुखःची बाब म्हणजे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू टिमने आपल्या चहात्यांचा मृत्यू समोर ठेवून आनंद साजरा केला ही बाब अत्यंत दुर्भाग्य पुर्ण व निंदनीय बाब आहे याचा सर्वच स्तरातून निषेध व्हायला पाहिजे. बंगळुरू स्टेडियमवर ही भयावह घटना का व कशी झाली याची कठोर चौकशी व्हायला पाहिजे.या मृत्यूच्या उत्सवाला जबाबदार कोण? कारण एका वेळेस एकच गोष्ट शक्य आहे उत्सव किंवा दु:ख.परंतु कर्नाटकच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर एकाच वेळेस उत्सव व शोककळा दिसून आली ही बाब अत्यंत धक्कादायक व मानवतेला मोठी जखम करणारी म्हणावी लागेल.कारण मातरम् व उत्सव एकत्र होऊच शकत नाही. परंतु ही घटना कर्नाटकात दिसून आली या घटनेची जितकी निंदा कराल तितकी कमीच आहे.केंद्र सरकार व संपूर्ण राज्य सरकारांना विनंती करतो की बंगळुरू स्टेडियमवरील घटना लक्षात घेता अशा घटना भविष्या घडणार नाही याची जातीने खबरदारी घ्यावी व बीसीसीआयने सुध्दा या घटनेची दखल घेऊन पुढील कारवाई करावी. चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेली घटना अत्यंत दुर्दैवी आणि दु:खद असुन मृत्यूमुखी पडलेल्यांच्या प्रती श्रद्धांजली अर्पण करतो व त्यांच्या परिवाराला या घटनेपासुन सावरण्याची ईश्वर शक्ती प्रदान करो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

************

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# विक्रोळी!

विक्रोळी म्हटलं की, सर्वप्रथम आठवतं ते फक्त विक्रोळीचाच नव्हे तर समग्र आंबेडकरी चळवळीचा राजा याच विक्रोळीत राहतो म्हणजे खरं सांगायचं तर राहत होते. कारण आज ते हयात नाहीत. त्या राजाचं नाव आहे, राजाभाऊ ढाले. दुसरं नाव घ्यायचं ते आंबेडकरी काव्यक्षेत्रात दादागीरी करणारा दादा स्मृतीशेष धुरंधर मिठबावकर.पाच,पाच कवितासंग्रह आज बर्याच कवींच्या नावावर असताना धुरंधरचा एकच कवितासंग्रह होता. त्याचं नाव 'नागपुत्राच्या कविता!' होय. हा एकच कवितासंग्रह असतानाही भले,भले नामचीन कवी धुरंधरला दबून असायचे. कारण धुरंधरचा हा कवितासंग्रहच जबराट आहे.अशावेळेस मला 'अमर अकबर अँथेनी' चित्रपटातला अमिताभचा डायलॉग आठवतो. अमिताभ बच्चन विनोद खन्नाला म्हणतो, तुम अपुनको दस,दस मारा. मगर अपून तुमको सिर्फ एक मारा पन सॉलिड मारा ना! धुरंधर आणि त्याचा हा एकुलता एक कवितासंग्रह, हे दोन्ही सॉलिडच आहेत. त्यानंतर आठवतात ते स्मृतीशेष खासदार एकनाथराव गायकवाड. एकनाथराव सुध्दा विक्रोळीत रहायचे. साहित्याची आवड आणि जाणिव असलेला अत्यंत चोखंदळ रसिक माणूस. त्यांनी व जेष्ठ साहित्यिक व कथाकथनकार वामनराव ओव्हाळ यांनी चालवलेली कबीर व्याख्यानमाला म्हणजे विक्रोळीचं अत्यंत महत्त्वपूर्ण संचित होतं. आता ती व्याख्यानमालाही नाही,वामनरावही नाहीत आणि एकनाथरावही नाहीत.याच विक्रोळीत आणखीन एक मोठ्ठा कवी रहायचा.त्याचं नाव अरुण म्हात्रे.आता तो वांगणीच्याही पुढे राहायला गेलाय.त्याच्या अनेक कविता आजही आठवतात. छातीत फुले फुलण्याची, वार्यावर मने झुलण्याची।। ती वेळ निराळी होती,ही वेळ निराळी आहे।। आणि खरोखरच ती वेळ निराळीच होती आणि आजचीही वेळ निराळीच आहे. याच विक्रोळीत एका कविसंमेलनात नवाकाळचे सुरेश नगर्सेकर प्रमुख पाहुणे असताना मी नवाकाळचे तीन,तेरा करणारी कविता वाचली होती. आणि मग नगर्सेकरांनी जो थयथयाट केला होता तोही आठवला.याच विक्रोळीत लोकशाहीर विठ्ठल उमप रहायचे. विठ्ठल दादांच्या नावाने आज विक्रोळीत एक सांस्कृतिक भवन उभं आहे. याच भवनात विठ्ठल दादांच्या मुलाने म्हणजेच संदेशने गेल्या वर्षी आमच्या उठावचं कविसंमेलन ठेवलं होतं. आमच्या लहानपणी प्रत्येक लग्नात आम्ही एका गाण्यावर भन्नाट नाचायचो.ते गाणं म्हणजे, तुझा खर्च लागला वाढू, सांग कितीदा कर्ज काढू? थोडा मोठा झाल्यावर कळलं की,या गाण्याचे कवी कुंदन कांबळे असून ते सुध्दा विक्रोळीतच राहतात. वैर जिंकावे प्रेमाने, युध्दाने वाढते युध्द।। शाक्य कोलीय संघर्षात वदले गौतम बुद्ध।। यासारख्या अनेक लोकप्रिय गाणी लिहणा-या या थोर गीतकारासोबत आम्हाला कविसंमेलन करण्याचा अनेक वेळा सुवर्ण योग आला.



मुळात कुंदन कांबळे हे उठावचे संस्थापक कवी होते आणि शनिवारी ते जिथे राहत होते तिथेच उठावचा कार्यक्रम होणार आहे.याच विक्रोळीत प्रेमानंद गज्वी सारखे दिग्गज नाट्यलेखकही राहतात.आमचा रमेश भवारही याच विक्रोळीत रहायचा.आता तो नाशिकला राहतो. याच विक्रोळीत संजय सावंत,अशोक निकाळजे,गौतम सांगळे, प्रवीण यादव,विष्णू भंडारे यासारखे आंबेडकरी चळवळीतील अत्यंत सजग असणारे असंख्य मित्र राहतात.एका अर्थाने विक्रोळी म्हणजे आंबेडकरी सांस्कृतिक चळवळीचा एक सशक्त बालेकिल्लाच आहे. खरं तर विक्रोळीबाबत सांगण्यासारखं बरंच काही खुप,खुप सांगता येईल.या छोट्याशा लेखात आणखीन बर्याच जणांचा उल्लेख करायचा राहून गेलाय,याचीही मला जाणीव आहे. पण ते आपण सर्व समजून घ्याल ही खात्री आहे. तर अशा या विक्रोळी नामे सांस्कृतिक नगरीत शनिवारी ७ जूनला उठावचा कार्यक्रम होतो आहे आणि याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. या कार्यक्रमाला यावे,असे आवाहन विक्रोळीकरांना करण्याची आम्हाला अजिबात गरज वाटत नाही. विक्रोळीकर आवर्जून या कार्यक्रमात सहभागी होतील ही खात्री बाळगून येथे थांबतो. जयभीम!

*********

विवेक मोरे
अध्यक्ष उठाव साहित्य मंच

# अवकाळीग्रस्तांना दिलासा?

अवकाळीचा फेरा आला आणि होते नव्हते ते घेऊन गेला, असे शेतकरी आणि अवकाळीचा फटका बसलेल्यांबाबत म्हणता येईल. सरकारची तातडीने मदत मिळाली तर दिलासा मिळेल. संपूर्ण महाराष्ट्रात अवकाळी पावसाने हाहाकार माजवला. यंदाच्या वर्षी लवकरच हा पाऊस सुरू झाल्यामुळे शेतीच्या मशागतीसाठी व पेरणीसाठी शेतकर्यांना काहीच करता येईना. त्यामुळे बळीराजा चिंताग्रस्त असून हवालदिल झाला आहे. रोहिणीचा पेरा चुकण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. या तडाखेबाज पावसाने उन्हाळी पिकांचे पूर्णपणे नुकसान झाले आहे. दोन वर्षांपूर्वी राबराब राबून हातात आलेले पीक गारपिटीने व अवकाळी पावसाने बघता बघता गिळंकृत केले होते.

जगाच्या पाठीवर भारतीय शेतजमीन अत्यंत सुपीक आहे. अगदी प्राचीन काळापासून कृषी संस्कृतीच्या पाऊलखुणा या देशात टिकून आहेत. आज एकविसाव्या शतकातसुद्धा कृषी उद्योग जगभरात सर्वश्रेष्ठ मानला जातो. भारतात आज पारंपरिक पद्धतीबरोबरच आधुनिक पद्धतीने शेती व्यवसाय केला जातो. शेतीतून उत्पादनही मोठ्या प्रमाणात घेतले जाते. भारत अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला असून भारतीय अन्नधान्याच्या निर्यातीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. याचे संपूर्ण श्रेय इथल्या कष्टकरी शेतकरी व शेतमजूर यांच्याकडे जाते. मात्र, यंदा प्रचंड वादळवारे, मान्सूनपूर्व व अवकाळी पावसामुळे रब्बी पिकांची, फळबागांची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. खरिपाच्या पिकांची तर शाश्वतीच नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. पशुधन, पक्षी व मानवी जीवनावरही त्याचा दुष्परिणाम होत आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने एक दोन वर्षे झाली की महाभयंकर नैसर्गिक आपत्तीला बळीराजाला तोंड द्यावे लागते. कर्जबाजारी होऊन आत्महत्येला प्रवृत्त होत आहे. एक दोन दिवस झाले की, शेतकरी आत्महत्यांचे वृत्त कानावर पडत आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे, ही परिस्थिती बदलण्यासाठी मायबाप सरकारने आता शेतकर्यांच्या बाजूने कंबर कसून उभं राहिलं पाहिजे. नैसर्गिक आपत्तीला कोणीही थोपवू शकत नाही, हे वास्तव आहे. नैसर्गिक आपत्ती ही पूर्वकल्पना नसताना येते आणि अल्प कालावधीत होत्याचे नव्हते करून जाते. नैसर्गिक आपत्तीशी सामुदायिकपणे, परस्पर सहकार्य व समन्वयाने सामना करावा लागतो. आपत्तीग्रस्त शेतकरी, शेतमजूर, गोरगरीब, दीनदुबळे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची जबाबदारी मायबाप सरकारची असते. शेतकर्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून ताबडतोब सरकारने शेतकर्यांना आधार द्यायला हवा.

राज्यातील महसूल विभागाने नुकसान झालेल्या पिकांचे त्वरित, योग्य व वास्तव पंचनामे करायला हवेत. अर्थात आजवरच्या अनुभवावरून तलाठी, ग्रामसेवक व मंडल अधिकारी तसेच कृषी खात्याचे अधिकारी पंचनामे करताना कामचुकारपणा व भेदभाव तसेच आर्थिक गैरव्यवहार करतात. त्यांची मिलीभगत असल्याने वास्तवतेप्रमाणे नुकसानग्रस्त शेतकर्यांना योग्य ती नुकसानभरपाई मिळत नाही व त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान होते. गरीब व असाह्य शेतकरी याविरोधात दाद मागू शकत नाही. तरी सर्व आपत्तीग्रस्त शेतकर्यांच्या नुकसानीचे व्यवस्थित व योग्य ते सर्वे क्षण व्हावे आणि कोणत्याही आपत्तीग्रस्त शेतकर्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी घ्यावी. यात अडथळा किंवा भ्रष्टाचार करणार्यांवर कारवाई करण्यात यावी.

शासनाने प्रांतभेद करू नये शेतकर्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून योग्य ते आर्थिक सहाय्य करताना शासनाने प्रांतभेद करू नये. राज्यात ज्या ज्या प्रांतात शेतकर्यांच्या पिकांची, फळबागांची व पशुधनाची नासाडी, नुकसान झाले आहे त्या सर्व शेतकर्यांना समान न्यायाने आर्थिक साहाय्य व्हावे. अन्यथा राजकीय हस्तक्षेपामुळे एखाद्या भागात तसेच ठराविक शेतकर्यांना झुकते माप दिले जाते, असे होऊ नये.

# लघवी करताना सतत होणारी जळजळ असू शकते 'या' गंभीर आजारांचे संकेत, दुर्लक्ष न करता आरोग्याची घ्या काळजी



चुकीची जीवनशैली, कामाचा वाढलेला तणाव, आहारात होणारे बदल, खाण्यापिण्याच्या सवयी इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम शरीरावर लगेच दिसून येतो. मात्र वारंवार शरीरात दिसून येणाऱ्या गंभीर समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. शरीरात निर्माण झालेल्या पाण्याच्या कमतरतेमुळे बऱ्याचदा लघवी करताना जळजळ होते तर काहीवेळा उन्हाळी लागण्याची शक्यता असते.लघवीमध्ये होणारी जळजळ बऱ्याचदा अतिशय सामान्य समस्या म्हणून ओळखली जाते. पण सतत लघवी करताना जळजळ होत असल्यास आरोग्यासंबंधित गंभीर समस्यांचे संकेत असू शकतात. लघवीमध्ये होणारी जळजळ केवळ डिहायड्रेशनमुळेच नाही तर मूत्रपिंडातील आजार किंवा मधुमेह, किडनीच्या आजारांमुळे सुद्धा होऊ शकते. त्यामुळे या समस्यांकडे दुर्लक्ष न करता डॉक्टरांचा योग्य सल्ला घ्यावा. युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शन: लघवीमध्ये वाढलेली जळजळ अनेक लोक सामान्य समस्या म्हणून लक्ष देतात. पण असे न करता डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य उपचार करणे आवश्यक आहे. युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनची महिलांमध्ये प्रामुख्याने दिसून येते. ही समस्या उद्भवू लागल्यानंतर मूत्रमार्गात इन्फेक्शनचा धोका वाढतो. बॅक्टेरिया मूत्रमार्गात प्रवेश करतात, ज्यामुळे मूत्रपिंडात वेदनांना होणे, जळजळ होणे किंवा इतरही समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे शरीरात युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनचा धोका वाढू लागल्यास स्वच्छतेकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ही समस्या टाळण्यासाठी नियमित भरपूर पाणी प्यावे, स्वच्छतेची काळजी घ्यावी आणि लैंगिक संबंधांनंतर लघवी करावी.

लैंगिक संबंधातून पसरणारे आजार: लघवी करताना जळजळ होण्यामागे अनेक कारण आहेत. लैंगिक संबंधातून पसरणारे आजार झाल्यानंतर सुद्धा लघवीमध्ये जळजळ होण्याची शक्यता असते. गोनोरिया, क्लॅमिडीया यांसारखे लैंगिक संसर्ग यासाठी कारणीभूत ठरतात. त्यामुळे या आजारांपासून बचाव करण्यासाठी सुरक्षित लैंगिक संबंध ठेवावे, कंडोमचा वापर करावा. यामुळे हे आजार शरीरात प्रवेश करत नाही.

मूत्राशयातील खडे: अधिक वेळ लघवी थांबवून ठेवल्यामुळे मूत्रातील खनिज पदार्थ एकत्र होऊन मूत्रपिंडात खड्डे तयार होण्याची शक्यता असते. हे खड्डे झाल्यानंतर ओटीपोटात वेदना होणे, लघवी करताना वाढलेली जळजळ, लघवी करताना वेदना होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते उपचार करणे आवश्यक आहे.

## एका दैनिकाच्या बेवड्या पत्रकाराने धार्मिक तेड निर्माण करण्याचा केला प्रयत्न पत्रकारिता क्षेत्राला काळीमा फासणाऱ्यावर केज पोलिसात गुन्हा दाखल

केज/प्रतिनिधी एका दैनिकाच्या बेवड्या पत्रकाराने धार्मिक तेड निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. पत्रकारिता क्षेत्राला काळीमा फासणाऱ्या एका पत्रकारा विरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील कर्मवीर शिक्षण संस्थेच्या आवारात स्वातंत्र्य सेनानी बसलींग आप्पा भुजबळ यांचे सिमेंट काँक्रेट ने बांधलेले स्मारक आहे.

१० मे २०२५ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास चिंचोली माळी येथील एका दैनिकाचा पत्रकार रोहन गलांडे याने आमचे श्रद्धास्थान असलेले स्वातंत्र्य सैन्यांनी बसलिंग आप्पा भुजबळ यांच्या स्मारकाच्या ओट्यावर बसून दारू पीत असल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले होते.

सदर फोटो हे व्हायरल झाल्यामुळे स्वातंत्र्य सैन्यांनी बसलींग अप्पा भुजबळ यांच्या स्मारकाची विटंबना झाली असून सर्वच समाजातील नागरिकांमध्ये चीड निर्माण झाली आहे.

सदर स्मारकाची विटंबना झाल्यावर समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. रोहन गलांडे हा यापूर्वी ही गावातील दोन समाजामध्ये वाद होईल अशा प्रकारच्या पोस्ट वायरल करत होता त्यामुळे समाजातील शांतता भंग होण्याची दाट शक्यता आहे.

त्यामुळे अशा विकृत वृत्ती असणारा



रोहन उत्तम गलांडे यांनी दारू पिऊन स्वातंत्र्य सैन्यांनी बसलींग आप्पा भुजबळ यांच्या स्मारकाची विटंबना करून धार्मिक भावना दुखावल्या आहेत. रोहन गलांडे सदर ठिकाणी दारू पीत असताना धनंजय महादेव शिंदे या दोघांनी त्यास त्या ठिकाणाहून उठून जाण्यास सांगितले असता तो म्हणाला की, मी एका दैनिकाचा पत्रकार आहे तुम्ही माझे काय वाकडे करू शकत नाही असे म्हणून त्या दोघांना शिवीगाळ केली.

सहा जून २०२५ रोजी अशोक रमेश राऊत रा. चिंचोलीमाळी यांच्या फिर्यादीवरून केज पोलीस ठाण्यात गु.र.नं.२९०/२०२५ कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत कलम २९८,३५२ नुसार रोहन उत्तम गलांडे याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कानिस्टेबल बाबासाहेब बांगर हे करत आहेत.

## सर्दी खोकला होईल कमी! पावसाळ्यात झटपट घरी बनवा क्रिम गार्लिक मशरूम सूप, नोट करून घ्या रेसिपी



पावसाळा ऋतूला सगळीकडे सुरुवात झाली आहे. या दिवसांमध्ये सगळीकडे थंडगार वातावरण असते. थंड वातावरणात सगळ्यांचं काहींना काही खाण्याची इच्छा होते. कधी गरमागरम कांदाभजी बनवली जाते तर कधी विकत आणलेले सूप प्याले जाते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बाहेर विकत मिळणाऱ्या पदार्थांपेक्षा घरी बनवलेल्या पौष्टिक आणि हेल्दी पदार्थांचे सेवन करावे. कारण या दिवसांमध्ये साथीच्या आजारांची मोठ्या प्रमाणावर शरीराला लागण होते. साथीचे आजार वाढू लागल्यानंतर शरीरात सतत थकवा, अशक्तपणा जाणवू लागतो. त्यामुळे या दिवसांमध्ये घरात बनवलेल्या सूपचे सेवन करावे. कारण सूप पिणे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. थंड वातावरणात गरमागरम सूप प्यायल्यामुळे सर्दी खोकल्यापासून तात्काळ आराम मिळतो. म्हणूनच आज आज आम्ही तुम्हाला क्रिम गार्लिक मशरूम सूप बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हे सूप चवीला अतिशय सुंदर लागते.

साहित्य: मशरूम कांदा लसूण क्रीम मीठ बटर आलं कोथिंबीर काळीमिरी पावडर दूध लिंबाचा रस

कृती: क्रिम गार्लिक मशरूम सूप बनवण्यासाठी सर्वप्रथम, मशरूमवरील साल काढून स्वच्छ धुवून घ्या आणि मशरूमचे मध्यम तुकडे करा.

पॅनमध्ये बटर घालून त्यात आलं, लसूण, कांदा आणि कोथिंबिरीच्या काड्या घालून परतवून घ्या.

त्यानंतर त्यात मशरूम आणि काळीमिरी पावडर टाकून शिजवून घ्या. शिजवून थंड झालेले मिश्रण मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक पेस्ट तयार करा.

पॅनमध्ये पुन्हा एकदा बटर टाकून त्यात थोडासा मैदा घालून मिक्स करा आणि दूध टाका. पेस्ट तयार झाल्यानंतर त्यात भाजून घेतलेले मश्रूम आणि तयार केलेली पेस्ट टाकून मिक्स करा.

सूप बनवताना त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून मिक्स करू करा. नंतर त्यात काळीमिरी पावडर, मीठ आणि क्रीम घालून मिक्स करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले क्रिम गार्लिक मशरूम सूप.

# भगवान विष्णूंना समर्पित या मंदिराचे नाव आहे सास-बहू, पण असं का? चला नावामागची कथा जाणून घेऊया

हिंदू धर्मात अनेक देवी-देवतांना मानले जाते, त्यांची बरीच मंदिरेही देशात प्रचलित आहेत. भारतात धार्मिक पर्यटनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. लोक दूरदूरवरून या धार्मिक ठिकाणांना भेट द्यायला जातात. प्रत्येक ठिकाणाची वेगळी खासियत असते आणि इथे मनोभावनेने पूजा केल्याने आपल्या सर्व मनोकामना पूर्ण होतात असे सांगितले जाते. त्यातच आता आज आम्ही तुम्हाला देशातील अशा अनोख्या मंदिराविषयी माहिती सांगणार आहोत ज्याचे नाव तुम्ही आजवर ऐकले नसेल. हे मंदिर फार प्राचीन असून याविषयी अनेकांना फारशी माहिती नाही. आम्ही तुम्हाला ज्या मंदिराविषयी सांगत आहोत त्याचे नाव 'सास-बहू' असे आहे. मंदिराचे नाव ऐकताच अनेकजण याला सासू-सुनेच्या नात्याशी अथवा सासू-सुनेच्या कुठेही जोडू पाहतील मात्र आम्ही तुम्हाला सांगतो की, या मंदिरात असे काहीच नाही, इथे देवीची पूजाही केली जात नाही मग या मंदिराला असे नाव का पडले असावे? चला प्रथम या मंदिराबद्दल सविस्तर माहिती जाणून घेऊया.



सास-बहू मंदिर कुठे आहे? सास-बहू हे मंदिर भारताच्या राजस्थान राज्यातील अलवर जिल्ह्यात आहे. हे मंदिर जयपूरपासून १५० किमी आणि उदयपूरपासून सुमारे २० किमी अंतरावर असलेल्या लहान नागदा गावात आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की, या मंदिराचा इतिहास १०० वर्षांहून अधिक जुना आहे. १० व्या शतकात या मंदिराची स्थापना करण्यात आली, त्याची वास्तुकला मध्ययुगीन भारतीय शैलीत आहे. मंदिराच्या भिंतींवर रामायण आणि महाभारताच्या कथा कोरलेल्या आहेत. मंदिर जंगले, पर्वत आणि हिरवळीने वेढलेले आहे. येथील शांत वातावरण आणि कलात्मक कोरीवकाम पर्यटकांना आकर्षित करते.

याला सास-बाहू मंदिर का म्हणतात? खरं तर, मंदिराचे नाव सहस्त्रबाहू मंदिर आहे. हे मंदिर हजारो हात असलेल्या भगवान विष्णूला समर्पित आहे. अनेकदा लोक सहस्त्रबाहू मंदिराचे नाव उच्चारू शकत नव्हते. चुकीच्या उच्चारामुळे लोक सहस्त्रबाहूला सास-बाहू म्हणत असत. त्यांनतर कालांतराने या ठिकाणाला सास-बहू हे नाव पडलं, आजही हे मंदिर या नावानेच प्रचलित आहे मात्र याचा सासू-सुनेशी काहीही संबंध नाही.

या संकुलात दोन मंदिरे आहेत कच्छवाह राजवंशातील राजा महिपालची पत्नी भगवान विष्णूची उत्कट भक्त होती. तिच्यासाठी राजाने विष्णूजींचे एक सुंदर मंदिर बांधले, ज्याचे नाव सहस्त्रबाहू असे ठेवण्यात आले. जेव्हा राजाच्या मुलाचे लग्न झाले तेव्हा सून शिवभक्त होती. सुनेची श्रद्धा मानून राजाने त्याच मंदिर संकुलात भगवान शिवाला समर्पित एक मंदिर बांधले. अशाप्रकारे आता इथे एकाच ठिकाणी दोन मंदिरं आहेत. इथे जाताच शांततामय वातावरण आणि हिरवळीचे अनोखे दृश्य पाहता येते त्यामुळे धार्मिक पर्यटन करायला आवडत असेल तर एकदा तरी या मंदिराला नक्की भेट द्या.

# महागड्या स्किन केअर प्रॉडक्टचा वापर करण्याऐवजी २० रुपयांचा 'हा' पदार्थ नक्की वापरा, त्वचा होईल मुलायम सुंदर

सर्वच ऋतूंमध्ये त्वचेची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये त्वचेची गुणवत्ताअतिशय खराब होऊन जाते. सतत उन्हात बाहेर फिरल्यामुळे त्वचा काळवंडणे किंवा त्वचेवर पिंपल्स येऊ लागतात. चेहऱ्यावर आलेल्या पिंपल्समुळे त्वचा कोरडी आणि निस्तेज होऊन जाते. अशावेळी महिला त्वचा सुंदर करण्यासाठी बाजरात उपलब्ध असलेल्या हानिकारक स्किन केअर प्रॉडक्ट किंवा क्रीमचा वापर करतात. मात्र कोणत्याही चुकीच्या प्रॉडक्टचा वापर केल्यास त्वचेची गुणवत्ता आणखीनच खराब होण्याची शक्यता असते. क्रीमचा वापर केल्यामुळे चेहऱ्यावरील काळे डाग निघून जातात पण त्वचा अतिशय निस्तेज होते.



मागील अनेक वर्षांपासून त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी बेसनचा वापर केला जात आहे. बेसन त्वचेसाठी उत्तम मानले जाते. यामुळे चेहऱ्यावर आलेले डाग, मुरूम आणि पिंपल्स कमी होण्यास मदत होते. अनेक महिला त्वचेसंबंधित कोणत्याही समस्या उद्भवू लागल्यास बेसनाचा वापर करतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला २० रुपयांच्या बेसनाचा कशा पद्धतीने वापर करावा? यामुळे त्वचेला नेमके काय फायदे होतात? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. यामुळे त्वचा अधिक मऊ आणि चमकदार होईल.

बेसन मधाचे कॉम्बिनेशन: त्वचेसंबंधित कोणतीही समस्या उद्भवू लागल्यानंतर बेसन लावण्याचा सल्ला सगळ्यात आधी दिला जातो. कारण यामुळे त्वचा स्वच्छ होते. बेसन नॅचरल क्लींजर म्हणून ओळखले जाते. बेसनाचा फेसपॅक त्वचेवर लावल्यास त्वचेवरील अतिरिक्त तेल कमी होईल आणि त्वचा अधिक सुंदर चमकदार दिसेल. त्वचा कायम फ्रेश ठेवण्यासाठी बेसनचा वापर करावा. बेसनातील अँटीऑक्सिडेंट्स त्वचेतील टॉक्सिन्स नष्ट करून टाकतात. यामुळे त्वचेचे पोर्स टाईट होतात. मधामध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे त्वचा मुलायम आणि हाइयड्रेट होते. त्वचेवर वाढलेले इन्फेक्शन घालवण्यासाठी मधाचा वापर करावा.

बेसन फेसपॅक बनवण्याची कृती: सर्वप्रथम, वाटीमध्ये बेसन घेऊन त्यात मध मिक्स करा. त्यानंतर त्यात गुलाबपाणी किंवा कच्चे दूध टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. मिक्स करून झाल्यानंतर जाडसर पेस्ट तयार होईल. या मिश्रणात कोणताही पदार्थ जास्त टाकू नये. तयार केलेली पेस्ट संपूर्ण चेहऱ्यावर लावून काहीवेळ तशीच ठेवा. यामुळे त्वचा अधिक मुलायम आणि सुंदर होण्यास मदत होईल. १० मिनिटं ठेवल्यानंतर त्वचा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. हा उपाय केल्यामुळे त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यास मदत होईल.

बेसन मध चेहऱ्यावर लावण्याचे फायदे: बेसनाचा वापर जेवणातील अनेक पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. यामध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे त्वचा अधिक सुंदर आणि मुलायम होते. त्वचेची खराब झालेली गुणवत्ता सुधारण्यासाठी बेसन मधाचा फेसपॅक चेहऱ्यावर लावावा. चेहऱ्यावर वाढलेले टॅनिंग कमी करण्यासाठी मध अतिशय फायदेशीर आहे. मध त्वचा उजळदार करते. त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी बेसन फेसपॅक प्रभावी आहे.

## नायगांव ते इस्थळ रस्त्याची झाली चाळणी ;प्रवाशी त्रस्त रखडलेल्या रस्ते कामासाठी ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील अनेक रस्त्यांची सुधारणा होत असताना काही रस्त्यांची मात्र, दुरवस्था झाली आहे. तर काही ठिकाणी होणारी कामे ही असून खोळंबा अशी झाली आहेत.

याबाबत अधिक वृत्त असे की,तालुक्यातील मौजे नायगांव ते इस्थळ या रस्त्याची पूर्णतः चाळणी झालेली असून त्याची अत्यंत दुरवस्था झालेली आहे.त्यात नायगाव ते सौंदना या गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अनेक महिन्यांपासून रखडलेले आहे.गुत्तेदराने त्या स्त्याचे बी.बी.एम पर्यंतचे काम करून सोडून दिले आहे.काही ठिकाणी तर काम होण्याअगोदरच गुडघाभर खड्डे पडले आहेत.बी.बी.एम करून सोडल्याने रस्त्यावरील खडे उघडे पडल्याने प्रवास करताना शरीराची चांगलीच वाट लागत आहे.

तसेच सौंदना ते इस्थळ हा रस्ता म्हणजे खड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा अशी अवस्था झाली आहे.अनेक वर्षापासून हा रस्ता याच अवस्थेत आहे.या खड्डेमय रस्त्यावरून जाताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.नायगाव ते इस्थळ या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी सौंदना,नायगाव येथील ग्रामस्थ उपोषणाच्या पवित्र्यात असल्याचे ग्रामस्थांनी बोलताना सांगितले.

## १० मिनिटांमध्ये सकाळच्या नाश्त्यात 'या' पद्धतीने बनवा बटाट्याचा किस, नोट करून घ्या रेसिपी

सकाळी उठल्यानंतर नेहमीच नाश्त्यात किंवा डब्यात नेमकं काय बनवावं? असे अनेक प्रश्न महिलांना सतत पडत असतात. नाश्त्यात कांदापोहे, शिरा, उपमा किंवा डोसा खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. अनेक घरांमध्ये सकाळचा नाश्ता नेहमीच बाहेरून विकत आणला जातो. पण नेहमी नेहमी बाहेरील तेलकट तिखट पदार्थ खाल्यामुळे शरीरात खराब कोलेस्ट्रॉलची पातळी वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे नाश्त्यात नेहमी घरी बनवलेल्या पौष्टिक आणि चवदार पदार्थांचे सेवन करावे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला झटपट तयार होणाऱ्या बटाट्याच्या किसची रेसिपी सांगणार आहोत.बटाटा खाणे अनेकांना आवडत नाही. पण या पद्धतीने बनवलेली बटाट्याची भाजी घरातील सगळ्यांचं नक्की आवडेल. बटाटा उपवासाच्या दिवशी सुद्धा खाल्ला जातो. त्यामुळे जिऱ्याची फोडणी देऊन बनवलेला बटाट्याचा किस उपवासासाठी सुद्धा उत्तम पर्याय आहे. चला तर जाणून घेऊया बटाट्याचा किस बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य: बटाटा जिरं मीठ हिरवी मिरची नारळ शेंगदाण्याचा कूट साखर तूप कृती: बटाट्याचा किस बनवण्यासाठी सर्वप्रथम, बटाट्याची साल काढून किसणीच्या सहाय्याने बटाटा किसून घ्या.

त्यानंतर बटाटा पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. ४ ते ५ वेळा बटाटा धुवून स्वच्छ केल्यानंतर पुन्हा एकदा पाण्यात बटाट्याचा किस काहीवेळ तसाच ठेवा.

पॅन गरम करून त्यात शेंगदाणे भाजून घ्या. शेंगदाणे भाजून थंड झाल्यानंतर त्यांची साल काढून जाडसर बारीक वाटा.

कढईमध्ये तूप गरम करून त्यात जिरं, बारीक चिरून घेतलेली हिरवी मिरची घालून मिक्स करा.

दोन्ही पदार्थ खमंग भाजून झाल्यानंतर त्यात बटाट्याचा किस टाकून मिक्स करा.

बटाटा टाकून मिक्स करा. त्यात चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. वाफेवर बटाटा व्यवस्थित शिजल्यानंतर त्यात पुन्हा एकदा चमचाभर तूप टाकून मिक्स करा.

नंतर त्यात बारीक करून घेतला शेंगदाण्याचा कूट, किसून घेतलेलं ओलं खोबर आणि चवीनुसार थोडीशी साखर घालून मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला बटाट्याचा किस.

# ०३ वर्षीय बालकाच्या अपहरणाचा उलघडा.. आरोपी अटक. बालक सुखरूप पालकांच्या ताब्यात.

## पोलीस ठाणे विवेकांनदच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी.

लातूर :- ०३ वर्षीय बालकाच्या अपहरणाचा उलघडा.. आरोपी अटक. बालक सुखरूप पालकांच्या ताब्यात.* पोलीस ठाणे विवेकांनदच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगिरी. याबाबत अधिक माहिती अशी की, दि.२६/०५/२०२५ रोजीचे १०.३० वा. दरम्यान गुमस्ता कॉलनी, कव्हा रोड, लातूर येथील एका तीन वर्षीय बालकाचा कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण करून पळवुन घेऊन जाण्याची घटना घडली होती. सदर घटनेवरून वरून पो.स्टे. विवेकानंद चौक, लातूर येथे गुरनं ३४६/२०२५ कलम १३७ (२) भारतीय न्याय संहिता प्रमाणे दिनांक २६/०५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याचा प्राथमिक तपास सपोनि शिनगारे यांनी केला त्यांची बदली झाल्यानंर सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उप निरीक्षक सचिन रेडेकर हे करीत आहेत.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे,अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी लातूर शहर रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथक यांना सखोल मार्गदर्शन व सुचना करून रवाना करण्यात आले होते. दरम्यान सदर पोलीस पथकांने मोठ्या प्रमाणात गोपनिय बातमीदार नेमूण




तसेच शास्त्रीय व तांत्रीक पध्दतीचा अवलंब करून गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न करून ताब्यात घेण्यात आले. आरोपी नामे महेश रमाकांत सुर्यवंशी, रा. सिध्देवर नगर, औसा ता.औसा याने मुलाचा अपहरण करून त्यास पळून घेऊन गेल्याचे कबूल केले.

विवेकानंद पोलीस ठाण्याच्या पथकाने आरोपीला आज दिनांक ०६/०६/२०२५ रोजी सोलापूर येथून तर बालकास पंढरपूर येथून स्थानिक पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेतले आहे.

सदरचा बालक सुखरूप असून त्याला त्याच्या आईचे ताब्यात देण्यात आला आहे.

नमूद आरोपीने नेमक्या कोणत्या कारणासाठी बालकाचा अपहरण करून पळवून घेऊन गेला होता यासंदर्भात वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस अधिक तपास करीत आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधीकारी (लातूर शहर) रणजीत सांवत यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे विवेकानंद चे पोलीस निरीक्षक संतोष पाटील यांचे नेतृत्वात पोलीस ठाणे विवेकानंद चौक, लातूर येथील पोउपनि सचिन रेडेकर, मनिष आंधळे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पथकामधील पोलीस अंमलदार खुर्रम काझी, गणेश यादव, यशपाल कांबळे, रवी गोंदकर, राणा देशमुख, संजय बेरळीकर, रमेश नामदास, सारंग लाव्हरे, सचिन राठोड, आनंद हल्लाळे, दिपक बोंदर, संतोष देवडे, गणेश साठे व शैलेश सुडे यांनी केलेली आहे.

# केज एसटी आगाराचा प्रश्न मार्गी लागणार !



केज/प्रतिनिधी केज शहर सध्या खामगाव-पंढरपूर व अहमदपूर-अहमदनगर महामार्गाच्या जोडणीवर आहे. येथून दररोज हजारो प्रवाशी बसगाडीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रवास करतात. केज येथे राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसचे आगार व्हावे या मागणीसाठी गेली अनेक वर्षांपासून सातत्याने आंदोलन आणि पाठपुरावा करणाऱ्या केज विकास संघर्ष समितीच्या या मागणीला आता यश येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. समितीच्या वतीने राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन त्यांना या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले असता त्यांनी एसटी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांना त्वरित प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले. लवकरच केज येथील सात एकर जागेवर सुसज्ज असे एसटी आगार तयार करून केज तालुका वासियांचे स्वप्न साकार केले जाईल, असे आश्वासन प्रताप सरनाईक यांनी दिले आणि या मागणीसाठी आपल्या वयाची तमा न बाळगता निस्वार्थी भावनेने सातत्याने आंदोलन आणि पाठपुरावा करणाऱ्या शेषराव घोरपडे आणि नासेर मुंडे यांचे कौतुक केले. केज येथे एसटी आगार उभारण्यासाठी ७ एकर १३ गुंठे जागा आरक्षित करण्यात आली असली तरी या जागेवर आगार काही उभे राहिले नाही. बाजूच्या धारूर, आंबेजोगाई, कळंब, पाटोदा अशा सर्व तालुक्यांमध्ये एसटी आगार असताना केज तालुक्यावर आणि तालुक्यातील प्रवाशांवर अन्याय सुरू आहे. हे आगार उभे रहावे म्हणून एसटीचे निवृत्त कर्मचारी असलेले शेषराव घोरपडे सातत्याने उपोषणे आणि आंदोलने करत आले आहेत. केज विकास संघर्ष समितीचे हनुमंत भोसले, नासेर मुंडे, रामहरी कोल्हे आदींनी त्यांच्या प्रयत्नांना साथ दिली आहे. परंतु, प्रशासनाने वेळोवेळी आश्वासने दिली असली तरी अद्याप कार्यवाही केलेली नाही.गुरुवारी केज विकास संघर्ष समितीचे शेषराव घोरपडे, नासेर मुंडे आणि केजचे भूमिपुत्र असलेले मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेत या विषयावर निवेदन सादर करीत सविस्तर चर्चा केली. केज तालुक्याची चार लाखाहून अधिक लोकसंख्या असतानाही या ठिकाणी एसटी आगार तयार करण्यात आलेले नाही. डेपो नसल्यामुळे केज तालुक्यातील जनतेला प्रवास करताना हाल सहन करावे लागत आहेत. लांब पल्ल्याच्या कोणत्याही गाड्या केज मधून सुटत नाहीत. त्या अन्य तालुक्यातून भरून येतात. त्यामुळे केज तालुक्यातील जनतेला लोंबकळत प्रवास करावा लागतो. केज तालुक्याच्या ग्रामीण भागातही म्हणावी तशी एसटी वाहतूक होत नाही. गेली काही वर्ष आगारासाठी मोक्याच्या ठिकाणी भूखंड असतानाही त्याचा वापर एसटी महामंडळाकडून केला जात नाही. राज्य सरकारने आतातरी आगार उभारून केज तालुक्यातील जनतेचा त्रास कमी करावा अशी मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे करण्यात आलयाची माहिती हनुमंत भोसले यांनी दिली.

यावर सरनाईक यांनी तातडीने वरिष्ठ अधिकाऱ्यांना फोन करून अद्याप आगार का होऊ शकले नाही. जागा असताना तिचा वापर का केला नाही, याची माहिती घेतली. तसेच या आगाराचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक संजय सेठी यांना दिले. त्यानंतर या शिष्टमंडळाला मुंबई सेंट्रल येथील एसटी महामंडळाच्या मुख्यालयात पाठवून सरनाईक यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा घडवून आणली. त्यांच्या निर्देशानुसार अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन मुख्यालयातील या बैठकीत अधिकाऱ्यांनी दिले. यावेळी आम्ही वयोवृद्ध व्यक्ती केज मधील एसटी आगार या सार्वजनिक बाबींसाठी सातत्याने प्रयत्न करत आहोत. परिवहन मंत्र्यांनी आमच्या मागणीची तातडीने दखल घेतली आणि कार्यवाही करण्याचे निर्देश दिले त्याबद्दल केज विकास संघर्ष समितीच्या वतीने हनुमंत भोसले, शेषराव घोरपडे आणि नासेर मुंडे यांनी सरनाईक यांचे आभार मानले. तसेच केज तालुक्याच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर स्थानिक लोकप्रतिनिधींनी देखील पुढे यावे, असे आवाहन केले.

# श्रीकृष्ण नगर - सम्राट चौक -नांदेड रोडला जोडणारा रस्ता खुला करण्यात यावा - नागरिकांच्या वतीने मनपाला निवेदन



लातूर :- श्रीकृष्ण नगर - सम्राट चौक -नांदेड रोडला जोडणारा रस्ता खुला करण्यात यावा - नागरिकांच्या वतीने मनपाला निवेदन माजी पालकमंत्री तथा लातूर चे लोकप्रिय आमदार अमितभैय्या देशमुख यांच्याकडे सुद्धा निवेदन करण्यात आली होती. त्यावर त्यांनी तातडीने दखल घेत लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त यांना प्रभाग क्रमांक ५ मधील श्रीकृष्ण नगर - सम्राट चौक -नांदेड रोडला जोडणारा रस्ता हा श्रीकृष्ण नगर,कोल्हे नगर, राहुल नगर,नवीन कोल्हे नगर,गौसपुरा,सम्राट चौक येथील नागरिकांच्या दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.सदरील रस्त्याच्या प्रश्न हा गेल्या पंचवीस ते तीस वर्षांपासून प्रलंबित असल्याने हा रस्ता खुला करावा अशा विषयाचे निवेदन दिले. या निवेदनाची प्रत लातूर शहरचे मनपा उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे यांना शिष्टमंडळासह भेट घेऊन निवेदन दिले . यावेळी कॉँग्रेस पक्षाचे प्रभाग अध्यक्ष खाजाभाई शेख,अल्पसंख्याक कॉँग्रेसचे प्रभाग ५ चे अध्यक्ष अस्लम शेख, राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रसिद्धी प्रमुख व फ्रंटल जिल्हा समन्वयक डी.उमाकांत,हुसेन बागवान, फिरदोस बागवान,इम्रान कुरेशी, अन्वर शेख,शेख पाशा,बागवान हुजेफ,सलाऊद्दी शेख यांच्यासह प्रभागातील नागरिक उपस्थित होते.

# अमेरिकेतील रिलिजस लिबर्टी अँड बिझनेस फाउंडेशनच्या वतीने 'ग्लोबल बिझनेस अँड इंटरफेथ पीस गोल्ड मेडल' ने डॉ. राहुल कराड यांचा वॉशिंग्टन डी.सी. येथे सन्मान

लातूर :- आंतरधार्मिक समाज, धार्मिक स्वातंत्र्य आणि शांततेसाठी समर्थन केल्याबद्दल एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांना या वर्षी अमेरिकेतील वॉशिंटन डीसी येथे आयआरएफ बिल्डर्स फोरम आणि रॉजर विल्यम्स आयआरएफ पुरस्कारांमध्ये प्रतिष्ठित २०२५ चा 'ग्लोबल बिझनेस अँड इंटरफेथ पीस गोल्ड मेडल' पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

अमेरिकेतील रिलिजस लिबर्टी अँड बिझनेस फाउंडेशनच्या वतिने नुकतेच अमेरिकेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रूबियो यांच्या हस्ते डॉ.राहुल कराड यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी रिलिजस लिबर्टी अँड बिझनेस फाउंडेशनचे अध्यक्ष ब्रायन जे ग्रिम उपस्थित होते.

यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. राहुल विश्वनाथ कराड म्हणाले सकारात्मक शांततेच्या तत्वांवर बांधलेला समाज लोकांना आधार देतो आणि भविष्यातील संकटांविरूद्ध लढण्याची ताकद देतो. अशा वेळेस उज्ज्वल भविष्याच्या शोधात शांती, ज्ञानाच्या देवाणघेवाण आणि मानव कल्याणासाठी सर्वांनी मिळून कार्य करावे. हा पुरस्कार



स्विकारतांना खूप मोठी जबाबदारी पडली आहे.

विद्यार्थ्यांना वैश्विक नागरिक बनविण्यासाठी डब्ल्यूपीयूत पीस स्टडीचा समावेश केला आहे. यातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शैक्षणिक अनुभव प्रदान करणे, संवाद साधणे, रचनात्मक, शांततापूर्ण उपयांसाठी कार्य करणे आणि ज्ञान व कौशल्यांनी सुसज्य आहे. तसेच डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी जगातील सर्वात मोठ्या वैश्विक शांतता डोम ची निर्मिती करून यातून विश्वशांतीचा संदेश दिला जात आहे. यावेळी देश विदेशातील नावाजलेल्या प्रतिष्ठित नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी करा पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत माजी मंत्री आ. अमित देशमुख यांचे आवाहन

लातूर / प्रतिनिधी :- पदाधिकाऱ्यांची नियुक्ती म्हणजे कॉँग्रेस पक्षाने व्यक्त केलेला विश्वास आहे. या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी पक्षाचा विचार आपल्या भागातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी आपल्यावर येऊन पडली असल्याचे सांगून येणाऱ्या लोकसभा, विधानसभा निवडणुकीचा अभ्यास करुन स्थानीक स्वराज्य संस्था निवडणूकीची तयारी करावी असे आवाहन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी करुन सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. लातूर शहर आणि ग्रामीण भागातील कॉँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने आज शुक्रवार दि. ६ जून २५ रोजी प्रभाग आणि ग्रामअध्यक्षांच्या नियुक्ती पत्रवितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्याला लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेस कमिटीचे सचिव अभय साळुंके, लातूरचे माजी महापौर विक्रांत मुंडे, डॉ. दीपक सूळ, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, ट्वेन्टीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, माजी उपमहापौर कैलास कांबळे आदी उपस्थित होते यावेळी ते बोलत होते. यावेळी बोलताना आमदार अमित विलासराव देशमुख यांनी, लातूर शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड. किरण जाधव यांनी केलेल्या या संघटनात्मक फेरबदलांचे कौतुक केले. ते म्हणाले की, हे बदल भविष्याचा वेध घेऊन केले असून, काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली आहे, तर काही जुने चेहरे कार्यमुक्त झाले आहेत आणि काही सदाबहार चेहऱ्यांनी आपले स्थान कायम ठेवले आहे. देशमुख यांनी महाराष्ट्रात असे संघटनात्मक फेरबदल करणारा लातूर हा कदाचित पहिला जिल्हा असेल असे नमूद केले. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी रणनीती: आमदार देशमुख यांनी लोकसभा आणि नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीचा बारकाईने अभ्यास करून आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका जिंकण्यासाठीची तयारी कॉँग्रेस



पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सुरू करावी, असे आवाहनही याप्रसंगी केले. लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे संदर्भ वेगळे असले तरी काही गोष्टी एकसारख्याच असतात. त्या अनुषंगाने कॉँग्रेस पक्षाला मिळालेली आणि विरोधी पक्षांना गेलेली मते याचा बारकाईने अभ्यास केला तर निवडणूक जिंकण्याचे तंत्र आत्मसात करता येईल असेही त्यांनी सांगितले. यापूर्वीच्या निवडणुकीत झालेल्या चुका कशा टाळता येतील, मतभेद बाजूला सारून सर्वांना एकत्र आणण्यासाठी काय करावे लागेल, उमेदवाराची निवड कोणत्या पद्धतीने करावी लागेल या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठी पदाधिकाऱ्यांचा एक अभ्यासगट स्थापन करून लगेच कामाला लागण्याच्या सूचनाही प्रमुख पदाधिकाऱ्यांना माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी दिल्या आहेत. नव्या ऊर्जे ने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकू! - खासदार डॉ. शिवाजी काळगे यांचे कॉँग्रेस कार्यकर्त्यांना आवाहन लातूर येथील कॉँग्रेस भवनमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी कॉँग्रेस कार्यकर्त्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी नव्या ऊर्जेने आणि उमेदीने कामाला लागण्याचे आवाहन केले. लोकसभा निवडणुकीत मराठवाड्यात विजय मिळवता आला असला तरी, विधानसभा निवडणुकीत मिळालेले अपयश त्यांनी मान्य केले. खासदार काळगे म्हणाले की, सत्ता नसल्यामुळे आपणाला काम करायला अडचणी येत असतात, त्यामुळे येणाऱ्या काळात आपण सत्ता खेचून आणू. यासाठी कॉँग्रेस कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले.

नुकत्याच झालेल्या पक्ष संघटनेतील नियुक्त्यांवर बोलताना ते म्हणाले की, सर्व नियुक्ती झालेल्या गुणवान कार्यकर्त्यांना आता काम करण्याची संधी मिळाली आहे. यावेळी त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या लातूर कॉँग्रेसच्या कार्यक्रमाला प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती लातूर येथे आयोजित कॉँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात विजयकुमार साबदे, गोरोबा लोखंडे, फारुख शेख, प्राध्यापक प्रवीण कांबळे, अहमदखान पठाण, व्यंकटेश पुरी, सुलेखा कारेपूरकर, रविशंकर जाधव, प्रवीण सूर्यवंशी, रामराजे काळे, एकनाथ पाटील, सचिन बंडापले आदिसह कॉँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, सर्व माजी नगरसेवक, सर्व प्रभाग अध्यक्ष, सर्व गाव अध्यक्ष आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शहर व ग्रामीण भागासाठी प्रभाग आणि ग्रामअध्यक्षांची नियुक्ती माजी मंत्री आमदार अमित देशमुख व खासदार डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते नियुकती पत्र प्रदान आगामी निवडणुका आणि संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने लातूर शहर आणि ग्रामीण भागासाठी कॉँग्रेस पक्षाने नवे प्रभाग अध्यक्ष आणि ग्रामअध्यक्ष नियुक्त केले आहेत. संबंधित नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या नावाची घोषणा करत त्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली आहेत. या नियुक्त्यांमुळे कॉँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले असून, आगामी काळात संघटनात्मक कामांना अधिक गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लातूर शहरातील प्रभाग अध्यक्ष पुढीलप्रमाणे: प्रभाग क्र. १: श्री. गोरोबा लोखंडे,प्रभाग क्र. २: श्री. सत्यवान कांबळे, प्रभाग क्र. ३: श्री. जी.ए. गायकवाड, प्रभाग क्र. ४: श्री. आसिफ बागवान, प्रभाग क्र. ५: श्री. यशपाल कांबळे, प्रभाग क्र. ६: श्री. गिरीष ब्याळे, प्रभाग क्र. ७: श्री. तबरेज तांबोळी, प्रभाग क्र. ८: श्री. सुरज राजे, प्रभाग क्र. ९: श्री. हारूण बासले, प्रभाग क्र. १०: श्री. डॉ. बालाजी साळूंके, प्रभाग क्र. ११: श्री. महादेव बरूरे, प्रभाग क्र. १२: श्री. धोंडिराम यादव, प्रभाग क्र. १३: श्री. ड. विजय गायकवाड, प्रभाग क्र. १४: श्री. सिद्राम कटारे (सर), प्रभाग क्र. १५: श्री. राजकुमार कत्ते, प्रभाग क्र. १६: श्री. बालाजी गवळी, प्रभाग क्र. १७: श्री. प्रा. संजय जगताप, प्रभाग क्र. १८: श्री. सुंदर पाटील कव्हेकर, ग्रामीण भागातील ग्रामअध्यक्ष यामध्ये बाभळगाव: श्री. अविनाश देशमुख, महापूर: श्री. संतोष भोसले, महाराणाप्रताप नगर: श्री. मुजाहिद इनामदार, शामनगर/१२ नं. पाटी: श्री. शिवलिंग धुमाळ, कव्हा: श्री. गोविंद इर्ले, सिरशी: श्री. रामराजे जाधव, कातपूर: श्री. दिनेश देशमुख, गंगापूर: श्री. भास्कर शिंदे, चांडेश्वर: श्री. महेश नलावडे, नांदगाव: श्री. सतिष कुलकर्णी, पेठ: श्री. दासराव सुर्यवंशी, बोरवटी: श्री. ज्योतीराम लकडे, पाखरसांगवी: श्री. अण्णासाहेब देशमुख, बसवंतपूर: श्री. बिरू सरवदे, हरंगुळ बु.: श्री. भिमाशंकर झुंझारे, हरंगुळ खु.: श्री. श्रीकांत भुजबळ, हणमंतवाडी: श्री. लक्ष्मण सपाटे, खंडापूर: श्री. नारायणराव ढोरमारे, खोपेगांव: श्री. विलास मोरे, खाडगांव: श्री. दौलत देशमुख, साई: श्री. ज्ञानेश्वर पवार, सिकंदरपूर: श्री. पुष्पराज सुरवसे या नियुक्त्यांमुळे शहरातील आणि ग्रामीण भागातील कॉँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांना नवसंजीवनी मिळाली असून, आगामी काळात संघटनात्मक कामांना गती मिळेल अशी अपेक्षा आहे. या बैठकीत ड. किरण जाधव, ड.दिपक सुळ, श्रीशैल उटगे यांनी भाषण केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कोळे यांनी केले, तर शेवटी फारुख शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE